00259



जा. नं. ग्रामपंचायत शेरीकासारे ता.पारनेर, जि.अ.नगर

दि. / /२०

प्रति,

मा. श्री. निलेशजी लंके साहेब

विधानसभा सदस्य पारनेर – नगर मतदार संघ

महाराष्ट्र राज्य.

**विषय : शेरीकासारे येथील वाघुले मळा या वस्तीवरील रस्ता काम होणेबाबत.**

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपणास विनंती कि, शेरीकासारे येथील वाघुले मळा या वस्तीवरील रस्ता अतिशय खराब झाला असून सदर रस्त्याने वाहतुकीस , नागरिकांच्या येण्या जाण्यास मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण झाल्या आहेत. अळकुटी शिव ते रांधे शिव येथील वस्तीवरील वाघुले मळा, श्री हरीवाडी व पाटीलमळा , मोरे , माने वस्ती वरील नागरिकांना रस्ता खराब असल्याने शेतीमालाची वाहतूक करण्यास अडचण होत आहे. वस्तीवरील नागरिकांची रस्ता होणेबाबत मागणी आहे. तरी आपणास विनंती कि, वाघुले मळा या ठिकाणी रस्ता काम व्हावे हि विनंती.

सरपंच

ग्रामपंचायत शेरीकासारे

ता. पारनेर, जि. अहमदनगर




।। ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया आहे. ।।

# ग्रामपंचायत कार्यालय, शेरीकासारे

ता. पारनेर, जि. अहमदनगर




जा. नं.                           दि.   /   /२०

ग्रामपंचायत शेरीकासारे ★ ता.पारनेर, जि.अ.नगर ★

**ग्रामपंचायत शेरीकासारे ता. पारनेर जि. अहमदनगर येथील ग्रामसभा दि. २८/८/२०२३**

**ठराव क्र ६/३ ची नक्कल**

विषय क्र. ६/३: वाघुले मळा या वस्तीवरील रस्ता काम होणेबाबत.

ठराव क्र. ६/३ : आपल्या गावातील अळकुटी शीव व रांधे शीव वस्तीवरील वाघुले मळा या ठिकाणी वस्तीवर जाणेयेणे साठी असणारा रस्ता अतिशय खराब झाला असून सदर रस्त्याने श्री हरीवाडी व पाटीलमळा , मोरे , माने वस्ती वरील नागरिकांना व विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात अडचण येत आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूस मोठे ओढे असल्याने वाहतुकीस अडचण येते. सदर वस्तीवरील नागरिकांची रस्ता काम होणेबाबत मोठ्या प्रमाणात मागणी आहे. तरी सदर रस्त्याचे काम होणेबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास पाठविण्यास आजची सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.

सूचक : श्री. सचिन नामदेव वाघुले

अनुमोदक : श्री. संदिप मनसुखराव मुळे

ठराव सर्वानुमते मंजूर

सरपंच
ग्रामपंचायत शेरीकासारे
ता. पारनेर, जि. अहमदनगर

**ग्रामसेवक**
ग्रामपंचायत शेरीकासारे
ता. पारनेर, जि. अहमदनगर